मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ताशांचा आवाज तारारारा झाला अन् गणपती माझा नाचत आला...

## सार्वजनिक मंडळांसह घराघरांत गणराय विराजमान, ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात आगमन

» पिंपरी | प्रतिनिधी

**'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या दणदणाटाने पिंपरी-चिंचवड शहर सोमवारी (दि. १४) गणेशमय झाले. सार्वजनिक गणेश मंडळांसह घराघरांत लाडक्या गणरायाचे भक्तिभावाने आणि उत्साहात आगमन झाले. सकाळपासूनच विविध भागांत गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या भाविकांची लगबग सुरू होती. फुलांची उधळण, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि बाप्पाच्या जयघोषामुळे शहरातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.**





चिंचवडगाव, भोसरी, सांगवी, पिंपरी, निगडी, आकुर्डी, चिंचवड, मोशी, वाकड, थेरगाव, किवळे आणि रावेत परिसरात बहुतांश सार्वजनिक गणेश मंडळांनी बाप्पांच्या आगमनासाठी सायंकाळी ढोल-ताशांच्या दणदणाटात व विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकांसह मिरवणुका काढल्या. यावेळी तरुणाईने ठेका धरला. अनेक ठिकाणी महिलांनी औक्षण करून श्रींचे स्वागत केले. छोट्या मंडळांनीही मिरवणुका काढल्या होत्या.

गणरायाच्या पूजेसाठी आवश्यक आघाडा, केवड्याची पाने, दुर्वा, जास्वंदासह गुलाबाच्या पाकळ्या, निशिगंध, कमळ, शेवंती, झेंडू, चाफा अशा विविध प्रकारची फुले, लहान-मोठ्या हारांना चांगली मागणी होती. हरतालिका पूजनासाठी हरतालिका मूर्ती, देवीची ओटी, वाळू, बेलपान, पाच झाडांची पाने खरेदीसाठी महिलांची गर्दी होती, असे चिंचवडगावातील हार-फूल विक्रेते मंदार जमदाडे यांनी सांगितले.

श्रींच्या पूजेसाठी आवश्यक असलेले देवाचे आसन, जाणवे, लाल वस्त्र, कापसाच्या वाती, अष्टगंध, चौरंग, नारळ, सुपारी, कापूर, अगरबत्ती, धूप, हळद-कुंकू, पंचामृतासाठी मध व अन्य साहित्यांची खरेदी करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

### नैवेद्यासाठी तयार मोदक, मिठाईला पसंती

गणरायाच्या नैवेद्यासाठी घरगुती पदार्थांसोबतच तयार मोदक आणि विविध प्रकारच्या मिठाईला भाविकांनी पसंती दिली. उकडीचे तसेच तळलेले मोदक, पेढे, बर्फी खरेदी करण्यासाठी गर्दी होती.

## गणेशोत्सवात गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही; २,५७३ जणांवर प्रतिबंधक कारवाई

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरोधात मोठी मोहीम हाती घेतली असून अवघ्या काही दिवसांत तब्बल २ हजार ५७३ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय ५८ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असून दोन सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्यांची थेट कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी २२ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवली. शहरातील चारही परिमंडळांमध्ये संशयित आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर लक्ष केंद्रित करून कारवाईचा धडाका लावण्यात आला.**



या मोहिमेदरम्यान परिमंडळ एकमध्ये ३६२, परिमंडळ दोनमध्ये २४७, परिमंडळ तीनमध्ये ५७२, तर परिमंडळ चारमध्ये तब्बल १ हजार ३९२ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. सर्वाधिक कारवाई परिमंडळ चारमध्ये झाल्याने त्या भागातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांचे विशेष लक्ष असल्याचे दिसून आले.

गणेशोत्सव काळात दहशत निर्माण करण्याची शक्यता असलेल्या गुन्हेगारांवर पोलिसांनी कठोर कारवाई केली. महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अंतर्गत ५० आणि कलम ५५ अंतर्गत ८ अशा एकूण ५८ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले. त्यामुळे या गुन्हेगारांना उत्सवकाळात शहराबाहेर राहावे लागणार आहे.

तसेच दोन सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्यांना कारागृहात पाठविण्यात आले आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या आणि पोलिसांच्या रडारवर असलेल्या गुन्हेगारांना या कारवाईमुळे मोठा धक्का बसला आहे.

गणेशोत्सवाच्या काळात सोशल मीडियाद्वारे अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणारे किंवा आक्षेपार्ह संदेश प्रसारित करणाऱ्यांवरही पोलिसांची करडी नजर आहे. सोशल मीडिया ग्रुप ॲडमिननी ग्रुपमधील मजकुरावर लक्ष ठेवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### बंधपत्र आणि नोटिसांची कारवाई..

पोलिसांनी बीएनएसएस कलम १२६ अंतर्गत ४१४ जणांकडून शांतता राखण्याचे बंधपत्र घेतले. कलम १२८ अंतर्गत ३२, तर कलम १२९ अंतर्गत २२० जणांवर कारवाई करण्यात आली. याशिवाय बीएनएस कलम १६८ अंतर्गत १ हजार ८०० जणांना नोटिसा बजावण्यात आल्या. बेकायदा दारूविक्री करणाऱ्या ३५ जणांवरही दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली.

# कोकणच्या चाकरमान्यांसाठी एसटीची 'गणेश'वारी

## वल्लभनगर आगारातून ५८ विशेष बस धावणार; गट आरक्षणाच्या ३६ गाड्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सुविधेसाठी राज्य मार्ग परिवहन (एस.टी.) महामंडळाने जय्यत तयारी केली आहे. पिंपरी- चिंचवड (वल्लभनगर) आगारातून गेल्या दोन दिवसांत कोकणासाठी एकूण ५८ विशेष बस गाड्या सोडण्यात येत आहेत. यामध्ये ३६ गाडया गट आरक्षणच्या ( ग्रुप बुकिंग), तर २२ गाडया नियमित आरक्षणाच्या आहेत.**





तसेच वाढती गर्दी लक्षात घेऊन आणखी ७ फेऱ्या सोडण्यात येणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे. शुक्रवार (दि.११) ग्रुप बुकिंग केलेल्या सहा गाड्या आणि आरक्षित अकरा अशा १७ गाडया सोडण्यात आल्या. शानिवार ( दि.१२ ) प्रवाशांचा प्रतिसाद वाढल्याने ३० ग्रुप बुकिंग आणि ११ आरक्षित अशा एकूण ४१ बस कोकणाकडे मार्गस्थ झाल्या.

या विशेष गाडया कोकणातील सावंतवाडी, दापोली, पोफळी, चिपळूण, परचुरी, मालवण, लांजा, दोडामार्ग आणि खेड या प्रमुख मार्गावर धावत आहेत. मागील काही काळापूर्वी लागू केलेली ३० टक्के भाडेवाढ रद्द करण्यात आली आहेत.

> कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एस.टी. महामंडळाने विशेष नियोजन केले आहे. तसेच प्रवाशांच्या मागण्यांनुसार ग्रुप बुकिंग आणि जादा गाडयांचे नियोजन केले जात आहे. त्यासह भाडेदरावर सवलत देण्यात येत आहे.
>
> - **वैशाली कांबळे, स्थानक प्रमुख, वल्लभनगर आगार.**

### ग्रुप बुकिंगला प्रतिसाद

गणेशोत्सवात एकाच गावातील प्रवशांना एकत्र प्रवास करण्यासाठी गट आरक्षणचा मोठा फायदा होतो. यामुळे संपूर्ण बस आपल्या सोयीनुसार आणि इच्छित वेळेत ठरवून घेता येते. एकाच वेळी संपूर्ण ग्रुपचे बुकिंग सहज शक्य होत असल्याने बसस्थानकावरील रांगेत उभे राहण्याचा त्रास वाचतो आणि संपूर्ण कुटुंबाचा किंवा सहकाऱ्यांचा प्रवास अधिक सोयिस्कर होतो.





# निगडीत कचरा वाहतूक करणाऱ्या डंपरच्या धडकेत पाच वर्षीय चिमुरडीचा मृत्यू

**पिंपरी | प्रतिनिधी**

**निगडी येथील साईनाथनगर परिसरात कचरा संकलनासाठी आलेल्या डंपरच्या धडकेत चिरडून पाच वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. 14) दुपारी घडली. या घटनेनंतर वाहन चालकास वाहनासह ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. 14 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी सुमारे 12.10 वाजण्याच्या सुमारास औदुंबर सोसायटीसमोर, साईनाथनगर, निगडी येथे महिंद्रा सुप्रो कचरा संकलन वाहन (क्र. MH-14-HG-7123) कचरा संकलनासाठी आले होते. यावेळी वाहनाची रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या दुचाकीला धडक बसली. धडकेमुळे दुचाकीचा आघात कु. संस्कृती भागवत बिरादार (वय 5 वर्षे, रा. औदुंबर सोसायटी, यमुनानगर, निगडी) हिला लागला. त्यामुळे ती वाहनाखाली आल्याने गंभीर जखमी झाली. घटनेनंतर तातडीने तिला उपचारासाठी निगडी येथील लोकमान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले.

अपघातानंतर महिंद्रा सुप्रो वाहन व त्याचा चालक राहुल प्रल्हाद चव्हाण (वय 28 वर्षे, रा. साने चौक, चिखली) तसेच त्याच्यासोबत असलेला राजू कुमार गायकवाड (वय 38 वर्षे, रा. राजनगर, ओटास्कीम, निगडी) यांना वाहनासह ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी अपघातास कारणीभूत ठरलेल्या चालक व संबंधित व्यक्तिविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून पोलिसांकडून पुढील तपास केला जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे साईनाथनगर व यमुनानगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# बाप्पाच्या नैवेद्यासाठी उकडीच्या मोदकांसह 'फ्लेवर'चीही मेजवानी

**पिंपरी | प्रतिनिधी**

**बाप्पाच्या आगमनाआधी दररोज काय नैरायचा याचे घरोघरी नियोजन केले जाते. नैवेद्याची विशेष तयारी करण्यासाठी भाविक सज्ज झाले आहेत. दहा दिवस विविध प्रकारच्या पक्वानांचा नैवेद्य असतो. भाविकांची गरज पाहता विविध फ्लेवरचे मोदक बाजारात दाखल झाले आहेत. उकडीच्या मोदकांसह फ्लेवरचे मोदक पसंतीस उतरत आहेत.**



गणेशोत्सव आणि उकडीचे मोदक हे समीकरणच आहे. बाप्पाला खास उकडीच्या मोदकांचा नैवेद्य दाखवला जातोच. याचबरोबर दररोज दहा दिवस गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. नैवेद्यासाठी सर्व प्रकारची मिठाई असतेच.

काजू कतली, विविध प्रकारच्या बर्फी, फ्लेवर्सचे मोदक यांना मागणी असते. या वेळी नारळ, सुका खोबरे महाग झाल्याने नैवेद्याकरिता खिशाला कात्री लावावी लागेल. मागील वर्षीच्या तुलनेत नारळ, साखर, दूध सगळेच जिन्नस महाग झाल्याने मोदकांची किंमतही वाढली आहे.

नैवेद्य असलेल्या पंचखाद्यात खोबरे, खारीक, खडीसाखर, खसखस वापरले जाते. यात सुक्या खोबऱ्याचा अधिक वापर केला जातो. खोबऱ्याच्या दरात झालेली वाढ पाहता यंदा बाप्पाची खिरापत महाग झाली आहे.

### मोदक दर

उकडीचा मोदक : 40 ते 50 रुपये नग, फ्लेवर मोदक - 650 रुपये किलो यामध्ये काजू मोदक, गाजर मोदक, गुलकंद मोदक, चीज - स्वीट- कॉर्न मोदक, चॉकलेट मोदक, पनीर मोदक, बुंदी मोदक, तळलेले मोदक, उकडीचे मोदक, रवा मोदक, सुक्या मेव्याचे मोदक, डार्क चॉकलेट मोदक, ओल्या नारळाचे मोदक, पंचखाद्य मोदक, गुलाबजाम मोदक, पान मोदक अशा प्रकारचे मोदक नैवेद्यासाठी उपलब्ध आहेत. कंदी पेढा - 480 रुपये किलो.

### गौरीच्या आरासासाठी फराळही

बेसन लाडू 500 रुपये, रवा लाडू 480 रुपये, मोतीचूर लाडू 450 रुपये, ड्रायफ्रुटस लाडू 950 रुपये, चकली 650 रुपये, शंकरपाळी 480 रुपये, चिवडा 480 रुपये, करंजी 480 रुपये, चिरोटे 550 रुपये, अनारसे 700 रुपये.

# पुणेकरांच्या हृदयात, विराजले गणराज!

## मानाच्या गणपतींसह शहरातील प्रमुख मंडळाच्या ‘श्रीं’ची विधिवत प्राणप्रतिष्ठापना

**पुणे | प्रतिनिधी**

**ढोल-ताशांचा कडकडाट... सनई-चौघड्याचा मंगल स्वर... फुलांनी सजलेले मंडप आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषाने दुमदुमलेले रस्ते अशा चैतन्यमय वातावरणात लाडक्या गणरायाच्या आगमनाने सोमवारी ((दि. १४)) अवघे शहर गणेशमय झाले. मानाच्या गणपतींच्या प्राणप्रतिष्ठापनेचा मंगल सोहळा भक्तिभावात पार पडला. सकाळपासूनच मध्यवर्ती पेठा आणि उपनगरांमध्ये ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’ चा जयघोष सरू होता. ढोल-ताशांचा निनाद, सनई-चौघड्यांचे मंगल सूर, बँड पथकांचे बहारदार वादन आणि पारंपरिक वेशभूषेतील कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून आला.**



पुण्याच्या गणेशोत्सवाची ओळख असलेल्या मानाच्या गणपतींच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची पावले मंडपाकडे वळली. पहाटेपासूनच परिसरात लगबग सुरू होती. मंडपांमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांची आरास अन् मोदकांचा प्रसाद अशा प्रसन्न वातावरणात विराजमान झालेल्या गणरायाचे रूप पाहण्यासाठी भाविक उत्सुक होते. प्राणप्रतिष्ठापनेच्या विधीला सुरुवात होताच संपूर्ण परिसरातील वातावरण मंत्रोच्चारांनी भारले गेले.

मानाच्या पाच गणपतींसह शहरातील प्रमुख सार्वजनिक गणेश मंडळांच्या आगमन मिरवणुका सकाळपासून मार्गस्थ झाल्या. फुलांनी सजवलेले आकर्षक रथ, चांदीच्या पालख्या, नगारावादन, शंखनाद आणि शिस्तबद्ध ढोल-ताशा पथके मिरवणुकांचे विशेष आकर्षण ठरले. लाडक्या गणरायाचे स्वागत करण्यासाठी रस्त्यांच्या दुतर्फा भाविकांनी गर्दी केली. महिलांनी औक्षण केले, तर युवक-युवतींनी पारंपरिक पोशाखात मिरवणुकांमध्ये सहभाग घेतला.

मानाचा पहिला श्री कसबा गणपतीची मिरवणूक सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी पारंपरिक चांदीच्या पालखीतून सुरू झाली. प्रभात बँडसह विविध ढोल-ताशा पथकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. मानाचा दुसरा तांबडी जोगेश्वरी गणपतीची मिरवणूक सकाळी दहा वाजता निघाली. दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी तांबडी जोगेश्वरीच्या श्रींची प्राणप्रतिष्ठा झाली. मानाचा तिसरा गुरुजी तालीम मंडळाच्या श्रीगणेशाची मिरवणूक सकाळी अकरा वाजता फुलांच्या रथातून सुरू झाली. दुपारी एक वाजता बाप्पा उत्सव मंडपात विधिवत विराजमान झाले.

मानाच्या चौथ्या तुळशीबाग गणपतीची मिरवणूक सकाळी नऊ वाजता पारंपरिक मार्गावरून निघाली. दुपारी साडेबारा वाजता श्रींची प्राणप्रतिष्ठा झाली. मानाचा पाचवा केसरीवाडा गणपती रमणबाग चौकातून पारंपरिक पालखीतून मार्गस्थ झाला. सनई-चौघडा आणि ढोल-ताशांच्या गजरात सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी बाप्पाची प्रतिष्ठापना झाली. मानाच्या पाचही गणपतींच्या मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची आगमन मिरवणूक सकाळी साडेआठ वाजता मुख्य मंदिरापासून फुलांनी सजवलेल्या मयूररथातून काढण्यात आली. मयूर, प्रभात आणि दरबार बँडसह गंधाक्ष ढोल-ताशा पथकाने मिरवणुकीची रंगत वाढवली. सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी श्रींची प्राणप्रतिष्ठापना झाली आणि दुपारी १२ पासून भाविकांसाठी दर्शन खुले झाले. यंदा मंडळाने वृंदावनमधील ‘प्रेम मंदिरा’ची प्रतिकृती साकारली असून, विशेष विद्युत रोषणाई हे प्रमुख आकर्षण ठरले आहे.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची मिरवणूक सकाळी सव्वाआठ वाजता ओंकारेश्वर मंदिरापासून निघाली. दुपारी साडेबारा वाजता प्रसिद्ध बासरीवादक पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठापना झाली. अखिल मंडई मंडळाच्या शारदा-गजाननाची मिरवणूकही उत्साहात पार पडली. हुतात्मा बाबू गेनू मंडळाच्या मिरवणुकीलाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भक्ती, शिस्त, सामाजिक एकोपा आणि पुण्याची वैभवशाली परंपरा जपत सुरू झालेला गणेशोत्सव आगामी दिवसांत धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगणार आहे.

### दगडूशेठच्या दर्शनासाठीही गर्दी

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची आगमन मिरवणूक सकाळी साडेआठ वाजता मुख्य मंदिरापासून फुलांनी सजवलेल्या मयूररथातून काढण्यात आली. मयूर, प्रभात आणि दरबार बँडसह गंधाक्ष ढोल-ताशा पथकाने मिरवणुकीची रंगत वाढवली. सकाळी ११.११ वाजता प्राणप्रतिष्ठापना झाली आणि दुपारी १२ वाजल्यापासून भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. यंदा मंडळाने वृंदावन येथील ‘प्रेम मंदिरा’ची प्रतिकृती साकारली असून, आकर्षक विद्युत रोषणाई हे विशेष आकर्षण ठरले आहे.

# गणेशोत्सवात मुंबईकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना ‘ब्रेक’

**पुणे | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवातील गणेशमूर्तींच्या आगमन आणि विसर्जन मिरवणुकांमुळे ठाणे, नवी मुंबई आणि मुंबई परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी जड-अवजड मालवाहू वाहनांना विशिष्ट दिवस आणि वेळेत प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्यामुळे पुण्याहून मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्याकडे जाणाऱ्या ट्रान्सपोर्टर्सनी निर्बंधांच्या वेळा लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन महामार्ग सुरक्षा पथकाच्या पुणे परिक्षेत्राने केले आहे.**



अपर पोलिस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार या प्रवेशबंदीची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. याचा परिणाम मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तसेच पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर होणार आहे.

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर १५, १८, १९ आणि २० सप्टेंबर रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून संबंधित विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत जड-अवजड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी राहणार आहे. त्यामुळे या दिवशी ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांनी प्रवासाचे वेळापत्रक त्यानुसार आखावे.

अनंत चतुर्दशीच्या मुख्य विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर २५ सप्टेंबर रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून २६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी राहणार आहे. या काळात मोठ्या प्रमाणात विसर्जन मिरवणुका निघणार असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

प्रवेशबंदीच्या काळात द्रुतगती मार्ग आणि राष्ट्रीय महामार्गावर जड वाहने उभी करून ठेवू नयेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ट्रान्सपोर्टर्स आणि मालवाहतूकदारांनी वाहने आधीच ट्रक टर्मिनल, लॉजिस्टिक पार्क किंवा सुरक्षित खासगी पार्किंगमध्ये उभी करावीत. प्रवेशबंदीचे उल्लंघन करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या निर्बंधांमुळे पुण्याहून मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्याकडे जाणाऱ्या मालवाहतूकदारांनी संबंधित दिवसांमध्ये प्रवास टाळून पर्यायी वेळेत वाहतूक करण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

# हिंजवडी मेट्रो धावणार; पुणेकरांचा प्रवास 45 मिनिटांत!

## माण ते जिल्हा न्यायालय १७ स्थानकांवर थेट सेवा; आयटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणेकरांसह आयटी कर्मचाऱ्यांचा रोजचा प्रवास सुकर करणारी पुणेरी मेट्रो सेवा सुरू या महिन्याच्या अखेरीस सुरू होणार आहे. या मार्गावरील सेवा पहिल्या १२ स्थानकांपर्यंत सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र आता माणपासून जिल्हा न्यायालयापर्यंत संपूर्ण मेट्रो मार्गावर आणि १७ स्थानकांवर सेवा सुरू करण्यात येणार आहे. या सेवेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**



हिंजवडी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रोची सेवा सुरू होण्याची प्रतीक्षा पुणेकरांसह आयटी कर्मचाऱ्यांना आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी (सीएमआरएस) माण स्थानक ते आर. के. लक्ष्मण संग्रहालय (बालेवाडी) स्थानक या १२ स्थानकांदरम्यानच्या मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यास २३ जुलैला मंजुरी दिली. त्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) सुरूवातीला १२ स्थानकांदरम्यान सेवा सुरू करण्याचे नियोजन केले होते. मात्र, आता आणखी पाच स्थानकांचे काम पूर्ण झाले असून, त्यांची तपासणी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून पुढील आठवड्यात होणार आहे.

मेट्रो सेवेचे उद्घाटन करण्याविषयी पीएमआरडीएने राज्य सरकारला पत्र लिहिले होते. राज्य सरकारकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटनाचे नियोजन करण्यात आले. यासाठी पंतप्रधान कार्यालयाला पत्रही लिहिण्यात आले. मात्र, पंतप्रधानांची वेळ न मिळाल्याने हे उद्घाटन लांबणीवर पडले. दरम्यानच्या काळात या मेट्रोच्या आणखी पाच स्थानकांचे काम पूर्ण झाले. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त पुढील आठवड्यात या स्थानकांची तपासणी करणार आहेत.

### सेवा सुरू होणारी स्थानके

माण, एमआयडीसी सर्कल, माण बस डेपो, हिंजवडी फेज-२ सर्कल २, हिंजवडी फेज-२ सर्कल १, पद्मभूषण चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, हिंजवडी फेज-१, वाकड चौक, शिवछत्रपती क्रीडा संकुल (म्हाळुंगे), मिटकॉन बालेवाडी, आर.के.लक्ष्मण संग्रहालय (बालेवाडी), औंध, सकाळनगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, कृषी महाविद्यालय, जिल्हा न्यायालय या १७ स्थानकांवरील या महिन्यात सेवा सुरू होणार आहे. त्यानंतर बालेवाडी हाय स्ट्रीट, बालेवाडी फाटा, बाणेर गाव, बाणेर-पाषाण लिंक रोड, भोसलेनगर आणि शिवाजीनगर ही स्थानके येत्या डिसेंबरपर्यंत सुरू होतील.

पंतप्रधान कार्यालयानेही टप्प्याटप्प्याने मेट्रो सेवा सुरू करण्याऐवजी पूर्ण मार्गावर सेवा सुरू करावी, अशी सूचना केली. त्यामुळे माण ते जिल्हा न्यायालय असा संपूर्ण मेट्रो मार्ग सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### प्रवासाचा वेळ वाचणार

सुरूवातीला मेट्रो सेवा ही माण ते बालेवाडी या १२ स्थानकांदरम्यान सुरू करण्याचे नियोजन होते. परंतु, आता सुरूवातीच्या माण स्थानकापासून अखेरच्या जिल्हा न्यायालय स्थानकांपर्यंत मेट्रो सेवा सुरू होणार आहे. यामुळे पुण्यातून हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमध्ये दररोज प्रवास करणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांचा प्रवास सुकर होणार आहें. सध्या या प्रवासासाठी दीड ते दोन तासांचा वेळ लागतो. मेट्रोमुळे हा वेळ केवळ ४५ मिनिटांवर येणार आहे.

---

# त्वमेव केवलं कर्तासी... समूह स्वरांत ३५ हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण



**पुणे | प्रतिनिधी**

**'ओम नमस्ते गणपतये'... 'मोरया, मोरया'... आणि 'ओम गं गणपतये नमः' च्या जयघोषाने ऋषीपंचमीनिमित्त आयोजित सोहळ्यात उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये मंग पहाटे हजारो महिलांच्या गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला. तब्बल ३५ हजारांहून अधिज महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. गणेश नामाचा जयघोष, अथर्वशीर्ष आणि महाआरतीने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवात उत्सव मंडपात झालेल्या उपक्रमास महापौर मंजूषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, सुवर्णयुग तरुण मंडळाचे सौरभ रायकर, यतिश रासने, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ घोडके,सचिन आखाडे, अंकुश रासने यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांचा या वेळी सन्मान करण्यात आला. पावसाचे वातावरण असले तरी पारंपरिक वेशात मध्यरात्री दोन वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाला हजेरी लावण्यास सुरुवात केली. उपक्रमाचे यंदा ४१ वे वर्ष होते.

महिलांनी शंखनाद केल्यानंतर सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर ओंकार जप, गणराजा गणनायका... मोरया रे बाप्पा मोरया रे... या गणेशगीताच्या सादरीकरणाने वातावरण मंत्रमुग्ध झाले.

महिलांनी अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. मोरया मोरया दगडूशेठ मोरया... असा गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावरील उत्साह ओसंडून वाहत होता. उत्सव मंडपापासून ते नाना वाडयापर्यंतच्या परिसरात महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरीता गर्दी केली. भक्तिरसात तल्लीन झालेल्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली.

महिला हात उंचावून टाळ्यांचा गजर करीत गणरायाला नमन करीत होत्या. मुंबई, सातारा, कोल्हापूर, लातूर आदी शहरातून महिला या उपक्रमासाठी आल्या होत्या. अर्चना भालेराव, प्रा. डॉ. गौरी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

### ४१ वर्षांची भक्तिमय परंपरा

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने आयोजित या सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचे यंदा ४१ वे वर्ष होते. चार दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या या उपक्रमाला दरवर्षी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यंदाही मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्याने या परंपरेला आणखी भव्य स्वरूप प्राप्त झाले.

### विविध शहरांतून महिलांचा सहभाग

पुण्याबाहेरूनही मोठ्या संख्येने महिला या सोहळ्यासाठी दाखल झाल्या. मुंबई, सातारा, कोल्हापूर, लातूर यांसह विविध शहरांतून आलेल्या महिलांनी सामूहिक पठणात सहभाग घेतला. त्यामुळे हा सोहळा केवळ पुण्यापुरता मर्यादित न राहता स्त्रीशक्ती आणि भक्तीचा व्यापक जागर ठरला.